वाचले :- १) शासन पत्र क्र.अधापू-१२०७/प्र.क्र.३०५४/ना.पु.२२,दिनांक ५ जुलै २००७
२) तहसिलदार यांचेकडून प्राप्त झालेली माहे जुलै २००७ करीता ए.पी.एल. गव्हाची मागणी व बी.पी.एल./अंत्योदय गहू/तांदुळाची मागणी

-------------ooo--------------

क्र.पुरवठा/हालचाल/धानि/आरआर/४४६/०७
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव,दिनांक २४-०७-२००७

## आदेश

माहे जुलै २००७ करीता शासनाकडून प्राप्त झालेल्या नियतनानूसार पुढील प्रमाणे तालुका निहाय नियतन करण्यात येत आहे. (आकडे क्विं. टनात )

| अ.क्रं. | तालुका | ए.पी.एल |
|---|---|---|
| | | गहू |
| २ | यावल | ४०० |
| ३ | रावेर | ३०० |
| ४ | सावदा | १०० |
| ५ | भुसावळ | १२०० |
| | एकूण | २००० |

उपरोक्त दर्शविल्या प्रमाणे धान्याची ट्रक आल्यानंतर धान्य गोदामात उतरवून घ्यावे. अंत्योदय,बी.पी.एल.धान्याच्या स्वतंत्र थप्प्या गोदामात लावण्यात याव्यात तालुक्यास मंजूर नियतनापेक्षा जास्त धान्य असल्यास गोदाम व्यवस्थापक यांनी धान्य उतरवून घेवू नये. अन्यथा होणा-या परिणामास संबंधित गोदाम व्यवस्थापक जबाबदार धरण्यात येवून डॅमरेज चार्ज त्यांचेकडून वसूल करण्यात येतील. गोदामातील धान्य वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना धान्य साठा वितरीत करावा. जेणेकरुन सदरील जुना साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही किंवा त्यात तुट येणार नाही. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त दिलेल्या नियतना प्रमाणेच सर्व तालुक्यास सम प्रमाणित धान्य पाठवावे. व धान्याची मुदतीत उचल पुर्ण करावी नियतन व्यपगत होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

बी.पी.एल.,अंत्योदय योजनेअंतर्गत ज्या याद्या कायदेशिर आहेत अशा पात्र लाभार्थींनांच गहू २० किलो प्रती कार्ड व तांदुळ १५ कि.लो. प्रती कार्ड असे एकुण प्रती कार्ड ३५ कि.लो. धान्य वाटप

होईल याची दक्षता घ्यावी. तसेच तालुक्यात स्वस्त धान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेवून दरमहा दुकानदार निहाय नियतन तहसिलदार यांनी मंजूर करावे. तसेच गोदामातील शिल्लक धान्य साठा लक्षात ठेवूनच स्वस्त धान्य दुकानदारांना परमिट द्यावे.गोदामात धान्य शिल्लक नसतांना धान्याचे अगावू परमिट देण्यात येवून प्रलंबित परमिट राहू देवू नयेत एका योजनेचे धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास प्रस्ताव इकडेस मंजूरीसाठी सादर करावा.तसेच वर्ग केलेल्या धान्याच्या नोंदी गोदामातील रजिष्टर व विवरणपत्रात घेण्यात याव्यात.

म.अ.जि
यांच्या मान्यतेने

अपर जिल्हाधिकारी,जळगांव करिता

प्रत :- तहसिलदार- - --------------
प्रत :- गोदाम व्यवस्थापक --------------------
प्रत :- उप विभागीय अधिकारी ------------- भाग ------------
प्रत :- बाबा ट्रेडींग कंपनी वाहतूक ठेकेदार जिल्हा जळगांव
२/- उपरोक्त दिलेल्या नियतनाप्रमाणेच सर्व तालुक्यात सम प्रमाणात धान्य पाठवावे. व धान्याची मुदतीत उचल पूर्ण करावी. नियतन व्यपगत होणार नाही याची खबरदारी घ्यावी. नियतन व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक ठेकेदार व वाहतूक प्रतिनिधी यांची राहील याची नोंद घ्यावी .